सकाळ » TODAY | सिंधुदुर्ग, शुक्रवार, २ सप्टेंबर २०२२



हळबे : स्टार्टअप यात्रेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सज्ज असलेली मोबाईल व्हॅन.

# दोडामार्ग महाविद्यालयात स्टार्टअप यात्रा मार्गदर्शन

दोडामार्ग, ता. १ : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत प्रशिक्षण शिबिर व स्टार्टअप यात्रा मार्गदर्शन याचे आयोजन केले होते.

या वेळी सोसायटीच्या राजबाली कचरे, प्रद्युम्न आढाव, अक्षय शिंदे व आयटीआय दोडामार्गचे श्री. जानवेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत उपस्थित होते.

राज्यातील नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शासनामार्फत स्टार्टअप यात्रेचे आयोजन केले आहे. ही यात्रा तीन टप्प्यात होणार असून, पहिल्या टप्प्यात राज्यातील प्रत्येक तालुक्यात लोकसमूह एकत्र येणाऱ्या ठिकाणी मोबाईल व्हॅनद्वारे स्टार्टअप यात्रेचा प्रचार आणि प्रसार केला जाईल. या वेळी नागरिक त्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना नोंदवू शकतात. दुसऱ्या टप्प्यात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

या स्पर्धेत जिल्हास्तरावर सर्वोत्तम कल्पना सादर करणाऱ्यास २५ हजारांपर्यंतचे पारितोषिक दिले जाणार आहे. तिसऱ्या व अंतिम टप्प्यात प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण होईल. त्यापैकी १४ विजेत्यांना प्रत्येकी एक लाख रुपये पर्यंतचे रोख अनुदान व अन्य पाठबळ मिळणार आहे. या वेळी आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनेसह स्टार्टअप यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन सोसायटीमार्फत करण्यात आले. डॉ. सोपान जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप बर्वे यांनी आभार मानले.